Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२, अंक २७] बुधवार, ऑगस्ट १९, २०२६/ श्रावण २८, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ५५.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक—नागपूर विभागीय पुरवणी

### संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इ. इ. केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश

भाग १ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ७६.

**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. १), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, यांजकडून**

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम १९(१) ची अधिसूचना**

क्रमांक मं.अ.-उजि(भू)-वि.पा.वि.म.-कावि-११६१-२०२६.—

ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या नागपूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) आणि (यात यापुढे ज्याचा निर्देश “ उक्त अधिनियम ” असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे, प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अधिसूचना क्रमांक मं.अ.-उजि(भू)-वि.पा.वि.म.-कावि-१५७-२०२६, दिनांक ०५ मे, २०२६ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या गावठाणा मधील जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, नागपूर, जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त गावठाणच्या जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी “ पुनर्वसाहत क्षेत्र ” म्हणून निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समूचित शासन जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी श्री. गणेश मरकड, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. १), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांस पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ५-अ-६५-२०२५-२६, प.ह.नं. ६७, गाव चन्ना, तालुका कुही, जिल्हा नागपूर.

| अ. क्र. | सर्व्हे क्रमांक | भूमीचा वर्ग | गाव नमुना नं. ७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र | संपादित क्षेत्र | झाडे | विहीर |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | | | हे. आर | हे. आर | | |
| १ | ८४ | वर्ग - २ | ० ६४ | ० ०९० | - | - |
| २ | १२२ | वर्ग - १ | १ २२ | ० ११० | - | - |
| ३ | १२३ | वर्ग - १ | १ ६२ | ० २५० | - | - |
| ४ | ५६/१ पैकी | वर्ग - १ | १ ०० | ० १६ | - | - |
| ५ | ५६/२ पैकी | वर्ग - १ | ० ६२ | ० १० | - | - |
| ६ | २६७/२ | वर्ग - १ | ३ ६० | ० ३२ | - | - |
| | | | एकूण . . | १ ०३ | | |

## अनुसूची-दोन
## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव : आंभोरा उपसा सिंचन योजना.

प्रकल्प कार्याचे वर्णन : आंभोरा उपसा सिंचन योजना टप्पा - २ अंतर्गत चन्ना वितरिकेच्या सा. क्र. ३३७८ मी. वरुन निर्गमित चन्ना लघुकालवा क्र. १ च्या मातीकाम व बांधकामाकरीता.

समाजाला मिळणारे लाभ : आंभोरा उपसा सिंचन योजनेचा लाभ सार्वजनिक जलप्रवाह व रस्त्याकरीता होणार आहे.

## अनुसूची-तीन
## बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

विस्थापित होत नाही.

## अनुसूची-चार
## पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र. एलएसी-कार्या-२५-कावि-१९-२०२६, दिनांक १८ नोव्हेंबर, २०२५.

**टीप :** उक्त जमिनीच्या नकाशाचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. १), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.

**गणेश मरकड,**

नागपूर :
दिनांक १४ ऑगस्ट, २०२६.

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. १),
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.